# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः23.09.2025 वारःमंगळवार

1. राज्यात बहुतांश ठिकाणी पावसामुळे शेतीचं नुकसान; जनजीवन विस्कळीत.
2. बंगालच्या उपसागरावर निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळं या आठवड्यात राज्यात जोरदार पावसाचा अंदाज. आणि
3. राज्यात शारदीय नवरात्रीचा उत्साह; कोल्हापूर, तुळजापूर, माहूर आणि वणी या साडेतीन शक्तीपीठांमध्ये उत्सवाचा प्रारंभ.

**पाऊस**

राज्यात बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस होत असल्यानं मोठ्या प्रमाणात शेतीचं नुकसान होत आहे. मराठवाड्यात सर्वत्र अतिवृष्टी झाल्यानं जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लक्ष ठेवून असून, मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधून त्यांनी काल परिस्थितीचा आढावा घेतला.

राज्यात अतिवृष्टीमुळं आतापर्यंत 66 लाख एकर क्षेत्राचं नुकसान झालं आहे. या नुकसानाचे पंचनामे करण्यात येत असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल असं आश्वासन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिलं.

**धाराशिव** जिल्ह्यात सीना नदीकडच्या अनेक गावांना पाण्यानं वेढा घातला असून परंडा तालुक्यातील वडनेर, देवगाव, शेळगाव, लाखी आवारपिंपरी या गावातील अनेक घरात पाणी शिरलं आहे. जिल्हा आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन पथक, लष्कराच्या सहाय्यानं मदत आणि बचाव कार्य करत आहेत. परंडा-बार्शी तसंच परंडा-कुर्डूवाडी हे मार्ग बंद झाले असून परंडा शहरातही अनेक ठिकाणी पाणी शिरल आहे.

**बीड** जिल्ह्यातील माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यानं धरणातून सिंदफणा नदीच्या पात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळं नदीकाठच्या गावांना प्रशासनानं सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**बुलडाणा** तालुक्यातील पाडळी परीसरात काल ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यानं पैनगंगा नदीचं पाणी पात्राबाहेर वाहू लागलं. शेती पाण्याखाली गेल्यानं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे.

**लातूर** जिल्ह्यात मांजरा, निम्न तेरणा, तावरजा प्रकल्पाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. निलंगा, औसा तालुक्यातील गावांचा संपर्क तुटला आहे. तर सोयाबीन आणि इतर पिकांची नासाडी झाली आहे, शिऊर गावच्या पाणीपुरवठ्याचे नळ वाहून गेल्यानं गावाचा पाणीपुरवठा बंद झाला आहे.

**अहिल्यानगर** जिल्ह्याच्या 24 महसूल मंडळात मुसळधार पावसामुळं पूरस्थिती निर्माण झाली आहे. विविध ठिकाणी दोनशेहून अधिक नागरीकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आल्याची माहीती पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

**सोलापूर** धारशिव आणि अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असल्यामुळं सीना नदीला महापूर येऊन अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. अनेक गावांना पावसाच्या पाण्यानं वेढा टाकला आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर आणि धारशिव जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे

**<u>हवामान</u>**

बंगालच्या उपसागरावर उद्या 24 तारखेला कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार असून 28 तारखेपर्यंत त्याचा प्रभाव राज्यात पडण्याची शक्यता आहे. परिणामी किमान 30 सप्टेंबरपर्यंत राज्यभरात पावसाचा जोर राहण्याचा अंदाज आहे.

**<u>माहिती तंत्रज्ञान</u>**

राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचं सक्षमीकरण करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल, या विभागाच्या आढावा बैठकीत सांगितलं. शासनाच्या सर्व सेवा, डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणं, कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि सायबर सुरक्षितता यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याला शासनाचं प्राधान्य असल्याचंही फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<u>पुरस्कार</u>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल मुंबईत क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गौरव पुरस्कार वितरित करण्यात आले. यावेळी राज्यातील 111 आदर्श शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. पुरस्कारप्राप्त शिक्षक, राज्याचे ब्रँड ॲम्बेसेडर असल्याचे गौरवोद्गार पवार यांनी यावेळी काढले. शिक्षकांचं कार्य महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी एका संदेशाद्वारे केलं. जिल्हास्तरावर आदर्श शैक्षणिक कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांना अनुक्रमे पाच, तीन आणि दोन कोटी रुपयांची पारितोषिकं दिली जातील असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी याप्रसंगी जाहीर केलं.

**<u>भरणे</u>**

शेतकऱ्यांच्या उसाला अधिकाधिक दर तसंच कामगारांना वेळेत वेतन तसंच बोनस देणाऱ्या साखर कारखान्यांना राज्य शासनाच्या वतीनं सहकार्य केलं जाईल असं आश्वासन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलं आहे. ते काल पुण्यात 'द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या' 70 व्या वार्षिक अधिवेशन आणि साखर प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी विविध पुरस्कारांचं वितरणही त्यांच्या हस्ते करण्यात आलं.

**<u>जीएसटी</u>**

देशभरात कालपासून सुधारित वस्तु आणि सेवा कर लागू झाला; या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना नवरात्र आरंभाच्या अनुषंगानं शुभेच्छा पत्र लिहिलं आहे. या सुधारणांमुळे देशात बचत उत्सव येईल असं त्यांनी आपल्या पत्रात म्हटलं असून या उत्सवाचा लाभ घेण्याचं आवाहन केलं आहे. अनेक व्यापारी आपल्या दुकानात फलक लावून बदललेल्या दरांची माहिती लोकांना देत असल्याबद्दल पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला. नव्या जीएसटी सुधारणांमधून आत्मनिर्भर भारताच्या अभियानालाही गती मिळेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

**<u>सेवा पर्व-पीएम कौशल विकास</u>**

सेवा आणि सुशासन, या मंत्रानुसार काम करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. सेवा पर्व या विशेष मालिकेत आज ऐकुया, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे तरुणांना कसं सक्षम केलं आहे...

**11 वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्ता हाती घेतली तेव्हा त्यांचे एक स्वप्न होते... देशातील लाखो तरुणांना कौशल्यपूर्ण बनवण्याचे स्वप्न. यासाठी त्यांनी स्किल इंडिया योजना सुरू केली. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही या योजनेचा एक भाग आहे. 15 जुलै 2015 या दिवशी सुरू झालेल्या या योजनेनं आता एक दशकाचा प्रवास पूर्ण केला आहे. या स्वप्नाबद्दल पंतप्रधान म्हणतात...**

***इंडस्ट्री में डिमांड होने के बावजूद नौजवानों में टैलेंट होने के बावजूद स्किल डेवलपमेंट ना होने से युवाओं के लिए नौकरी पाना अत्यंत कठिन हो गया था। हमने स्किल डेवलपमेंट के लिए अलग मंत्रालय बनाया और भारत में पहली बार स्किल इसी एक विषय के लिए डेडिकेटेड मंत्रालय है।***

**स्किल इंडिया मिशन केवळ देशातच नव्हे तर परदेशातही भारतीय तरुणांच्या क्षमतेला नवी ओळख देत आहे. पंतप्रधानांच्या सक्षम नेतृत्वामुळे आणि दूरदृष्टीमुळे हे शक्य झाले आहे. त्यांच्या योगदानामुळेच आज स्किल इंडिया मिशन नवीन भारताची एक शक्तिशाली ओळख बनली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, प्रशांत जाधव, पुणे.**

**नवरात्र**

अश्विन शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर काल राज्यात शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. घरोघरी घट बसून नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा केली जात आहे. या शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्य सरकारनं यावर्षी प्रथमच 'राज्य पर्यटन महोत्सवाचा' दर्जा दिल्यामुळं नऊ दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. कोल्हापूर, तुळजापूर, माहूर आणि वणी या साडेतीन शक्तीपीठांच्या ठिकाणी शारदीय नवरात्राला उत्साहानं प्रारंभ झाला आहे.

**तुळजापुरात** तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा संपल्यानंतर विधिवत घटस्थापना करण्यात आली. **कोल्हापूर**च्या महालक्ष्मी अंबाबाई मंदिरात घटस्थापनेनं उत्सवाला प्रारंभ झाला अंबाबाईची श्रीकमलालक्ष्मी रुपात पूजा बांधण्यात आली होती.

**नाशिक**च्या वणी इथल्या श्री सप्तश्रृंगी देवी मंदिरामध्ये देवस्थानचे अध्यक्ष अभय लाहोटी यांच्या हस्ते दागिन्यांची पूजा करण्यात आली त्यानंतर मिरवणूक काढण्यात आली आणि महापूजा करून घटस्थापना करण्यात आली.

**धुळे** जिल्ह्यात एकविरा देवीसह विविध मंदिरात नवरात्राला आरंभ झाला आहे. भाविकांनी गर्दी केली असून, मंदिर परिसर रोषणाई आणि फुलमाळांनी सजला आहे.

**अमरावती** जिल्ह्यात अडीच हजारपेक्षा अधिक ठिकाणी दुर्गा आणि शारदा देवींची स्थापना करण्यात आली आहे. **सोलापूर** जिल्ह्यात नवरात्र उत्सव काळात डॉल्बी, डीजे आणि लेझर लाईट वापरास बंदी घालण्यात आली आहे.

**सिंधुदुर्गम**ध्ये 130 सार्वजनिक, 40 खासगी ठिकाणी दुर्गामातांची प्रतिष्ठापना झाली असून, जिल्ह्यात भजन, रास गरबा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धांनी नवरात्रोत्सव साजरा होणार आहे.

**आयुर्वेद दिवस**

दहावा राष्ट्रीय आयुर्वेद दिवस आज साजरा करण्यात येत आहे. 'आयुर्वेद प्रत्येक मानवासाठी; आयुर्वेद पृथ्वीसाठी' अशी यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना आहे. यानिमित्तानं वैद्य नचिकेत वाचासुंदर यांनी केलेलं हे विवेचन...

**आयुर्वेद केवळ व्यक्तिगत आरोग्यासाठीच नव्हे तर पृथ्वीच्याही आरोग्यासाठी आहे. व्यक्ती आणि समष्टी यांचे आरोग्य परस्परावलंबी आहे असा व्यापक विचार यामागे आहे. तेवीस सप्टेंबर या दिवशी शरद विषुव असल्याने दिवस व रात्र एकसारखी असते. वर्षातील हा दिवस नैसर्गिक संतुलन आणि समरसतेचे प्रतीक आहे जे आयुर्वेदातील समत्वाच्या मूळ सिद्धांत, अशी मिळतेजुळते आहे. यामुळे भारतीय परंपरेला आता वैज्ञानिक आधार आणि वैश्विक संदर्भ मिळाला आहे. गतवर्षी एकशे पन्नास देशांमध्ये आयुर्वेद दिवस साजरा करण्यात आला होता. हजारो वर्षांची शास्त्रीय परंपरा असलेला आयुष्याचा वेध अर्थात आयुर्वेद हा ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये आधुनिक जीवनाचं विज्ञान म्हणून सर्वत्रच स्वीकारला जात आहे.**

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.